वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ९४०९/२०२४ दिनांक :-२८ / १२ /२०२४

-: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :-दिनांक ३१/१२/२०२४ रोजी पुणे परिसरातील वाहतुकीत करण्यात येणा-या बदलाबाबत.

**३१/१२/२०२४ रोजी नुतन वर्ष आगमना निमित्त पुणे कॅम्प (लष्कर) व डेक्कन,शिवाजीनगर परिसरातील वाहतुकीत करण्यात येणाऱ्या बदला बाबत.**

पुणे शहरातील लष्कर (कॅम्प) भागातील महात्मा गांधी रस्त्यावर तसेच डेक्कन वाहतूक विभागांतर्गत फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावर दिनांक ३१/१२/२०२४ रोजी वर्ष अखेर व नूतन वर्षारंभचे आनंदोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भागातील रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात रहदारी वाढून वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. या परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, लष्कर (कॅम्प) व डेक्कन परिसरातील वाहतूकीत बदलाबाबत**अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दि. ३१/१२/२०२४ रोजी १७.०० वा. पासून ते गर्दी संपेपर्यंत.**तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

➢ **महात्मा गांधी रोड, लष्कर (कॅम्प) परिसरः-**

१. वाय जंक्शन वरुन महात्मा गांधी रस्त्याकडे येणारी वाहतुक ही १५ ऑगस्ट चौक येथे बंद करुन ती कुरेशी मस्जिद व सुजाता मस्तानी चौकाकडे वळविण्यात येणार आहे.
२. ईस्कॉन मंदिर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, अरोरा टॉवरकडे जाणारी वाहतुक ही बंद करण्यातयेणार आहे.
३. व्होल्गा चौकाकडून महंमदरफी चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक सरळईस्ट स्ट्रीट रोडने इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येईल.
४. इंदिरा गांधी चौकातून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक इंदिरागांधी चौकातून लष्कर पोलीस स्टेशन चौकाकडे वळविण्यात येईल.
५. सरबतवाला चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक ताबूतस्ट्रीट मार्गे पुढे सोडण्यात येईल.

➢ **फर्ग्युसन कॉलेज रोड व जंगली महाराज रोड**

१. **फर्ग्युसन कॉलेज रोड** :- कोथरुड / कर्वेरोडकडुन येणारी वाहतूक खंडोजीबाबा चौक या ठिकाणी बंद करुन लॉ कॉलेज रोड, प्रभात रोड व अलका टॉकीज चौक मार्गे वळविण्यात येईल.
२. **जंगली महाराज रोड** :- जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, गुडलक चौक व इतर लेनमधुन फर्ग्युसन कॉलेज रोडकडे जाणारी वाहतूक **आवश्यकतेप्रमाणे**झाशी राणी चौक या ठिकाणी बंद करुन पुणे महानगरपालिका, ओंकारेश्वर मंदिर व शिवाजी रोड मार्गे वळविण्यात येईल.

➢ **नो-व्हेईकल झोन(दिनांक ३१/१२/२०२४ रोजी १७.०० वा.ते दि.०१/०१/२०२५ रोजी ०५.०० वा.)**

१. **फर्ग्युसन रोड** :- गुडलक चौक ते फर्ग्युसन कॉलेज मेनगेट पर्यंत.
२. **एम.जी.रोड** :- १५ ऑगस्ट चौक ते हॉटेल अरोरा टॉवर .

दि. ३१/१२/२०२४ रोजी वाहतुक शाखेतर्फे ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह बाबत विशेष मोहिम राबविण्यात येणार असुन मद्य प्राशन करून वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. सदर ड्रंक अॅण्ड ड्राईव्हची कारवाई करताना ब्लो पाईप (प्लास्टिक पाईप) एका व्यक्तिसाठी एक पाईप (युज अॅण्ड थ्रो)वापरण्यात येणार आहे. तरी नागरीकांनी मद्य प्राशन करुन वाहन चालवु नये असे आवाहन सर्वांना करण्यात येत आहे.उल्लघंन करणा-या इसमांवर कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

❖ पुणे शहरामध्ये दिंनाक ३१.१२.२०२४ चे ००.०१ ते ०१.०१.२०२५ चे २४.०० वा दरम्यान सर्व प्रकारचे जड/अवजड वाहनांना (ट्रक, डंपर, मिक्सर, बल्कर, जे.सी.बी.रोड रोलर,मल्टी एक्सल वाहनांसाठी ) खालील ठिकाणाच्या पुढे प्रवेश बंदी करण्यात येत आहे.सर्व वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करुन इच्छित स्थळी जावे.

१) थेऊर फाटा,लोणीकाळभोर पासुन पुढे २) हॅरीष ब्रिज, खडकी, ३)बोपखेल फाटा,विश्रांतवाडी
४) राधा चौक,बाणेर, ५)नवले ब्रिज,वारजे , ६)कात्रज चौक,कात्रज, ७)खडीमशीन चौक, कोंढवा,
८) मंतरवाडी फाटा, फुरसुंगी , ९) मरकळ ब्रिज पासुन पुढे प्रवेश बंद राहील.

❖ तसेच संपुर्ण पुणे शहर पोलीस आयुक्तालया मध्ये दिंनाक ३१.१२.२०२४ चे ००.०१ ते ०१.०१.२०२५ चे २४.०० वा दरम्यान सर्व प्रकारचे जड/अवजड वाहनांना (ट्रक, डंपर, मिक्सर, बल्कर, जे.सी.बी.रोड रोलर,मल्टी एक्सल वाहनांसाठी ) अंतर्गत वाहतूकी करीता सर्व रोडवरती प्रवेश बंदी करण्यात येत आहे.(अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ. वगळून )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३,४पुणे शहर.**
२. **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्दकरण्याची विनंती करावी.
३. **प्रभारी अधिकारी, सर्व** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणेफलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.
४. **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.
५. **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.